आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
५ जानेवारी २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पहिली स्वदेशी बनावटीची प्रदूषण नियंत्रक ‘समुद्र प्रताप’ नौका भारतीय तटरक्षक दलाच्या ताफ्यात दाखल

- आत्मनिर्भर गावं बनवण्याच्या दिशेने विकसित भारत जी रामजी कायदा हे महत्त्वाचं पाऊल असल्याचं केंद्रीय कृषीमंत्र्यांचं प्रतिपादन

- फसवे कॉल आणि SMS रोखण्यात अपयश आल्याबद्दल ट्रायकडून मोबाइल कंपन्यांना दीडशे कोटींचा दंड

- उमर खालीद आणि शार्जिल इमाम यांचा जामीन अर्ज सर्वोच्च न्यायालयानं फेटाळला

**आणि**

- बिलिअर्ड्स जगज्जेते मनोज कोठारी यांचं निधन

**<><><><><>**

देशातली पहिली स्वदेशी बनावटीची प्रदूषण नियंत्रक ‘समुद्र प्रताप’ ही नौका भारतीय तटरक्षक दलाच्या ताफ्यात आज गोवा इथं दाखल झाली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यावेळी उपस्थित होते. ही नौका सागरी प्रदूषण नियंत्रण नियमन, सागरी  कायदा अंमलबजावणी, बचाव आणि शोध मोहीम राबवण्यात उपयोगी पडेल. ही नौका देशाचा सामूहिक दृढनिश्चय आणि आत्मविश्वास यांचं प्रतीक असल्याचं सरंक्षण मंत्री यावेळी म्हणाले. सागरी जैवविविधतेचं संरक्षण करणं हे नैतिक जबाबदारी आहे, हे जहाज प्रवाळ खडक आणि समुद्री  जिवांचं रक्षण करेल, असं ते म्हणाले.

**- - होल्ड बाईट राजनाथ - -**

नौदलाच्या ताफ्यात समुद्र प्रताप नौका समाविष्ट झाल्यामुळे भारतीय तटरक्षक दलाची क्षमता वाढणार असून सागरी सुरक्षा, पर्यावरण सरंक्षण आणि स्वदेशीच्या संकल्पनेला चालना मिळणार आहे.

<><><><>

आत्मनिर्भर गावं बनवण्याच्या दिशेने विकसित भारत जी रामजी कायदा हे महत्त्वाचं पाऊल असल्याचं प्रतिपादन केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी केलं आहे. तामिळनाडूमधल्या इरोडमध्ये ते शेतकऱ्यांशी संवाद साधत होते. रोजगार निर्मिती मजबूत करणं, मूलभूत सोयीसुविधांचा विस्तार करणं आणि गावांना स्वयंपूर्ण करण्याच्या दिशेने उचललेलं हे महत्त्वाचं पाऊल असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><>

ऑपरेशन सिंदूरमध्ये एनसीसीच्या छात्रांनी बजावलेल्या कामगिरीचं उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी कौतुक केलं आहे. नवी दिल्लीत प्रजासत्ताक दिनाच्या संचलनाच्या निमित्तानं आयोजित एनसीसीच्या कॅम्पमध्ये ते बोलत होते. गिर्यारोहण, साहसी खेळ, मदत आणि बचाव कार्यातल्या योगदानाबद्दल त्यांनी या विद्यार्थ्यांची प्रशंसा केली. सायबर आणि ड्रोन तंत्रज्ञान शिकवण्यासाठी एनसीसीकडून होत असलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं.

<><><><>

टेलिकॉम नियामक ‘ट्राय’नं स्पॅम फोन आणि मेसेज थांबवू न शकलेल्या टेलिकॉम कंपन्यांवर १५० कोटी रुपये दंड ठोठावला आहे. २०२० ते २०२३ या वर्षातल्या दिरंगाईबद्दल ही कारवाई झाली आहे. ग्राहकांच्या तक्रारी चुकीच्या पद्धतीने बंद करणं, स्पॅम कॉल करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई न करणं

यासारख्या गोष्टींसाठी ट्रायनं हा दंड ठोठावला आहे. ट्रायच्या या कारवाईला टेलिकॉम कंपन्यांनी आव्हान दिलं आहे.

<><><><>

भारतीय रेल्वेनं चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत भांडवली खर्चाच्या ८० टक्क्यापेक्षा जास्त निधीचा वापर केला आहे. एकंदर २ लाख ५२ हजार २०० कोटी रुपयांपैकी २ लाख ३ हजार १३८ कोटी रुपये वापरल्याची माहिती रेल्वे मंत्रालयानं दिली आहे. सुरक्षिततेच्या योजना, क्षमतावर्धन, पायाभूत सुविधांचं आधुनिकीकरण, आणि प्रवाशांना सोयीसुविधा देण्यासाठी या निधीचा वापर केल्याचं मंत्रालयानं सांगितलं आहे.

<><><><>

गेल्या वर्षात भारताच्या उर्जा क्षेत्रात भरीव अशा सुधारणा झाल्या. अक्षय्य उर्जेकडे वाटचाल करताना भारताने २०२५ या वर्षात दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या सुधारणांची अंमलबजावणी केली. याविषयी आता सविस्तर ऐकुया...

**व्हीसी**

*भारतात कधीकाळी असलेल्या वीजटंचाईचा लाखो लोकांच्या जीवनावर गंभीर दुष्परिणाम होत होता. आर्थिक पातळीवर विखुरलेल्या वितरण कंपन्या, अव्वाच्या सवा किमती, वीजपुरवठा जाळ्यामध्ये कमी असलेली गुंतवणूक आणि संस्थात्मक शिस्तीचा अभाव या कारणांमुळे वीजटंचाई प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी वीज सुधारणा विधेयक २०२५ आणलं गेलं. हे विधेयक २००३च्या वीज कायद्यात सुधारणा करून अधिक चांगली वितरण व्यवस्था, वीज पुरवठ्याचं आधुनिकीकरण आणि गुणवत्तेवर आधारित वीजपुरवठ्याला प्राधान्य देणारं आहे. त्याखेरीज नवीकरणीय उर्जेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने विविध योजना सुरू करण्यात आल्या. सौर उद्यानं विकसित करणं, पीएम सूर्यघर योजनेसारख्या योजना आणणं, घराच्या छतावर सौरपॅनल बसवणं, शेतकऱ्यांसाठी पीएम कुसुम योजना आणणं या सर्व प्रयत्नांतून अक्षय उर्जेच्या दिशेने भारताने वाटचाल केली. त्यामुळे गेल्या वर्षाच्या मध्यापर्यंत भारत जगातल्या आघाडीच्या अक्षय्य उर्जा उत्पादक देशांपैकी एक झाला.*

<><><><>

महापालिका निवडणुकीत महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आल्याप्रकरणी मनसेनं मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. या निवडणुकांमध्ये ६८ ठिकाणी झालेल्या बिनविरोध निवडणुकीला स्थगिती द्यावी आणि मोठ्या प्रमाणात झालेल्या अर्ज माघारीची न्यायालयीन चौकशी करावी असं मनसेनं या याचिकेत म्हटलं आहे. मनसेचे ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांनी ही याचिका दाखल केली आ**हे.**

**<><><><><>**

२०२० च्या दिल्ली दंगलप्रकरणी अटकेत असलेला विद्यार्थी नेता उमर खालीद आणि शरजील इमाम यांचा जामीन सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला आहे. या दोघांना प्रथमदर्शनी यूएपीए अर्थात बेकायदेशीर कारवाई प्रतिबंधक कायद्या अंतर्गत अटक झाली असल्याचं कारण न्यायालयाने दिलं. दुसरीकडे याच खटल्यातील आरोपी गुलफिशा फातिमा, मीरन हैदर, शिफा उर रहमान, सलीम खान आणि शादाब अहमद यांना न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारीया यांच्या खंडपीठानं जामीन मंजूर केला.

**<><><><><>**

आवश्यकता नसेल तर इराणमध्ये प्रवास न करण्याचा सल्ला परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं भारतीय नागरिकांना दिला आहे. तसंच इराणमध्ये राहणाऱ्या भारतीय वंशाच्या नागरिकांनी खबरदारी घ्यावी, आंदोलन किंवा निदर्शनं सुरू असलेल्या ठिकाणांपासून दूर रहावं. इराणध्ये राहणाऱ्या भारतीयांनी तेहरानमध्ये दुतावासाकडे नोंदणी करावी, असं आवाहनही परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं केलं आहे.

**<><><><><>**

व्यावसायिक कामासाठी भारतात येणाऱ्या चिनी व्यावसायिकांसाठी भारतानं ई-बी-फोर हा ई-प्रोडक्शन इनव्हेस्टमेंट बिझनेस व्हिजा सुरू केला आहे. १ जानेवारीपासून हा व्हिजा सुरू झाला असून त्यासाठी ऑनलाईन अर्ज करता येईल, असं चीनमधल्या भारतीय दूतावासानं म्हटलं आहे. साधारण ४५ ते ५० दिवसांत

हा व्हिजा मिळेल आणि त्यावर सहा महिन्यांपर्यंत भारतात राहता येईल.कामासाठी भारतात येऊ इच्छिणाऱ्यांच्या संख्येत झालेली वाढ लक्षात घेऊन भारतानं हा नवा व्हिजा सुरू केला आहे.

<><><><>

परराष्ट्र मंत्री डॉ एस जयशंकर आजपासून फ्रांसच्या दौऱ्यावर असून ते पॅरिसला पोचले. भारत आणि फ्रान्सच्या वस्त्रपरंपरेसंबंधातल्या एका प्रदर्शनाला त्यांनी भेट दिली. या दौऱ्यात ते फ्रान्सचे  परराष्ट्र मंत्री ज्यो नोएल बॅरो यांची भेट घेऊन भारत-फ्रान्स व्यूहात्मक भागीदारी आणि इतर जागतिक महत्वाच्या बाबींवर चर्चा करतील. फ्रेंच राजदूतांच्या एका परिषदेलाही ते संबोधित करतील. फ्रान्सनंतर ते लक्झेम्बर्गला भेट देणार आहेत. तिथे ते लक्झेम्बर्गचे उपप्रधानमंत्री आणि परराष्ट्रमंत्र्यांशी चर्चा करतील आणि तिथल्या भारतीय समुदायाशी संवाद साधतील.

<><><><>

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज ‘खतबात ए मोदी- लाल किले की फासील से’ या उर्दू भाषेतल्या पुस्तकाचं नवी दिल्लीत अनावरण केलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०१४ ते २०२५ दरम्यान स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने केलेल्या सर्व भाषणांचं संकलन या पुस्तकात आहे. त्याशिवाय अंत्योदय, स्वच्छ भारत तसंच इतर राष्ट्रीय महत्वाच्या  संकल्पनांवरही या पुस्तकात माहिती आहे.

<><><><>

माजी बिलिअर्ड्स जगज्जेते मनोज कोठारी यांचं आज तामिळनाडूत तिरुनेलवेली इथं हृदयविकाराच्या झटक्यानं निधन झालं. ते ६७ वर्षांचे होते. बिलिअर्ड्समधल्या त्यांच्या कारकीर्दीत ते १६ वेळा राज्य विजेते झाले, तर १९९०मधे त्यांनी विश्वविजेतेपद पटकावलं. त्यांच्या या कामगिरीबद्दल २००५ मधे त्यांना ध्यानचंद पुरस्कारनं गौरवण्यात आलं होतं. तर गेल्या वर्षी बिलिअर्ड्स अँड

स्नूकर फेडरेशन ऑफ इंडियानं जीवनगौरव पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला होता. दहा दिवसांपूर्वी त्यांच्यावर यकृत प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करण्यात आली होती. मात्र काही दिवसांपूर्वी फुफ्फुसात संसर्ग झाल्यानं त्यांना रुग्णालयात दाखल केलं होतं. तिथंच त्यांनी शेवटचा श्वास घेतला.

**<><><><><>**

बांगलादेशनं आगामी आयपीएल स्पर्धेच्या प्रसारणावर अनिश्चित काळासाठी बंदी घातली आहे. कोलकाता नाईट रायडर्समधून बांगलादेशचा जलदगती गोलंदाज मुस्तफिजूर रहमान याला वगळल्यानंतर बांगलादेशनं हा निर्णय घेतला. रहमान याला संघाबाहेर काढायचा निर्णय बीसीसीआयच्या निर्देशांनुसार घेतला आहे. त्यामागे कोणतंही तार्किक कारण नव्हतं. याचे तीव्र पडसाद बांगलादेशच्या जनतेत उमटत असून त्यामुळे आयपीएलच्या प्रसारणावर बंदी घातल्याचं बांगलादेश सरकारच्या आदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

IRCTC घोटाळ्यात राजद नेते लालू प्रसाद यादव यांच्याविरुद्धच्या खटल्याला स्थगिती द्यायला दिल्ली उच्च न्यायालयाने आज नकार दिला. तसंच, या प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाला उत्तर सादर करण्याचे आदेश दिले. आपल्या विरुद्ध झालेल्या आरोपनिश्चितीला आव्हान देणाऱ्या यादव यांच्या याचिकेवर आज दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी झाली. या प्रकरणाची पुढची सुनावणी येत्या १४ तारखेला होणार आहे.

**//<><><><><>//**